# NAGPUR CITY POLICE COMMISSIONERATE

नागपूर शहर पोलीस आयुक्तालय

**(पोलीस वार्तापत्र)**

**(सायंकाळ)**

**दिनांक १४.०९.२०२६ सोमवार**

**(गुन्हे)**

**१) पोलीस ठाणे अंबाझरी :—शस्त्रासह धुमाकुळ घालणाऱ्या आरोपीस अटक.**

दिनांक १४.०९.२०२६ चे ०३.२० ते ०३.५५ वा. चे दरम्यान, अंबाझरी पोलीसांचे तपास पथक हे पोलीस ठाणे हद्दीत पेट्रोलींग करीत असता, त्यांना सुदाम नगरी, ओपन जिम जवळ, अंगात पिवळ्या रंगाचा शर्ट व निळ्या रंगाचा जिन्सपॅन्ट घातलेला इसम हातात चाकु घेऊन परिसरात धुमाकुळ घालतांना दिसुन आला. त्यास घेराव टाकून ताब्यात घेतले व त्याचे हातातील चाकु काढुन घेऊन, त्यास नि:शस्त्र केले. पंचासमक्ष त्यास त्याचे नाव पत्ता विचारले असता, त्याने त्याचे नाव तुषार रंजीत मेश्राम, वय २० वर्षे, रा. जुनी फुटाळा वस्ती, अमरावती रोड, अंबाझरी, नागपूर असे सांगीतले. आरोपीचे ताब्यातुन एक लोखंडी चाकु किंमती २५०/—रू. चा मुद्देमाल जप्त करण्यात आला.

आरोपी हा कोणतातरी दखलपात्र गुन्हा करण्याचे उद्देशाने हातात चाकु घेऊन धुमाकुळ घालतांना समक्ष मिळुन आल्याने व त्याने मनाई आदेशाचे उल्लंघन केल्याने, सरतर्फे फिर्यादी पोअं. सैय्यद हबीब अली यांनी दिलेल्या तक्रारीवरून, पोलीस ठाणे अंबाझरी येथे पोउपनि. प्रशांत गायकवाड यांनी आरोपीविरूध्द कलम ४,२५ भा.ह.का., सहकलम १३५ म.पो.का. अन्वये गुन्हा दाखल करुन, आरोपीस अटक केली आहे. पुढील तपास सुरू आहे.

**२) पोलीस ठाणे जरीपटका :— चोरी करणाऱ्या महिला आरोपीविरूध्द गुन्हा दाखल.**

फिर्यादी सौ. रेणु कन्हैयालाल लखवान, वय ५९ वर्षे, रा. प्लॉट क्र. ७२, बॅक कॉलनी, जरीपटका, नागपूर यांनी त्यांचे राहते घरी घरकाम करायला दिनांक ०३.०९.२०२६ पासुन, महिला नामे रोशनी वय ३५ वर्षे हिला कामावर ठेवले होते. फिर्यादी यांनी त्यांचे सोन्याचे कंगन, कानबाळी असा एकुण १,९२,०००/—रू. चा मुद्येमाल घराचे बेडरुममधील लाकडी वॉर्डरोबचे लॉकरमध्ये ठेवले होते. दिनांक १०.०९.२०२६ चे १४.०० वा. ते १२.०९.२०२६ चे १४.०० वा. चे दरम्यान, घरकाम करणाऱ्या नमुद महिलेने घरकाम करीत असतांना, फिर्यादीचे नमुद सोन्याचे दागिने चोरून नेले. अशा फिर्यादी यांनी दिलेल्या तक्रारीवरून पोलीस ठाणे जरीपटका येथे पोउपनि. देवचंद्र सहारे ८८३०२४०७३१ यांनी महिला आरोपीविरूध्द कलम ३०६ भा.न्या.सं. अन्वये गुन्हा दाखल केला आहे. आरोपीचा शोध व पुढील तपास सुरू आहे.

**३) पोलीस ठाणे वाडी :— प्राणांतिक अपघात करणाऱ्या आरोपीविरूध्द गुन्हा दाखल.**

दिनांक १३.०९.२०२६ चे १९.०० ते १९.३० वा. चे दरम्यान, फिर्यादी सौ. शिला चंद्रशेखर टेंभरे, वय ४४ वर्षे, रा. एलआयजी क्वॉर्टर क्र. ९३, म्हॉडा कॉलनी, दवलामेटी, वाडी, नागपुर यांचे पती नामे चंद्रशेखर टेंभरे व सासु नामे श्रीमती सयन अमृतलालजी टेंभरे, वय ६० वर्षे यांना त्यांचे होंडा ॲक्टिवा क्र. एमएमच ३१ ईएक्स ४५३४ ने डबलसीट घेवुन, पोलीस ठाणे वाडी हद्दीत लावा, महादेव नगर ते दवलामेटी रोड, शेतकरी हॉटेल जवळून जात असता, अशोक लेलॅन्ड कंपनीचा बोअरींग ट्रक क्र. केए ०१ एमके ५५७३ चे चालकाने

त्याचे ताब्यातील वाहन भरधाव वेगाने व निष्काळजीपणे चालवुन, फिर्यादीचे पतीचे मोपेडला मागुन धडक दिली. अपघातामध्ये फिर्यादीचे पती व त्यांची सासु वाहनासह खाली पडल्याने दोघेही गंभीर जखमी झाले. पोलीसांनी त्यांना उपचाराकरीता मेयो हॉस्पिटल येथे नेले असता, डॉक्टरांनी फिर्यादीचे सासुला तपासुन मृत घोषित केले. फिर्यादीचे पतीचा उपचार सुरु आहे.

यांप्रकरणी फिर्यादी यांनी दिलेल्या तक्रारीवरून पोलीस ठाणे वाडी येथे पोउपनि. सतिश मेश्राम ९२८४१४३३३१ यांनी बोअरवेल ट्रकचालक आरोपीविरूध्द कलम २८१,१०६(१) भा.न्या.सं. सहकलम १३४, १७७, १८४ मो.वा.का. अन्वये गुन्हा दाखल केला आहे. पुढील तपास सुरू आहे.

**(अकस्मात मृत्यु)**

**पोलीस ठाणे एमआयडीसी :–** दिनांक १४.०९.२०२६ चे ०८.०० वा. चे सुमारास, इसम नामे रोहीत रामदुलारे चौबे, वय ३१ वर्षे, रा. प्लॉट क्र. ७०/बी, एसआरपीएफ कॅम्प जवळ, पंचशील नगर, हिंगणा रोड, एमआयडीसी, नागपूर हे पोलीस ठाणे एमआयडीसी हद्दीतील निक्को जैस्वाल कंपनी येथे इलेक्ट्रीक मेंटेनन्सचे काम करीत असतांना, कंपनीतील मशिनचे कन्व्हेअर बेल्टमध्ये अचानक त्यांचा डावा अडकल्याने, त्यांचे हात व छातीला गंभीर दुखापत झाली. त्यांना उपचाराकरीता मेडीकल हॉस्पीटल, ट्रामा सेंटर येथे नेले असता, उपचारादरम्यान डॉक्टरांनी त्यांना मृत घोषीत केले.

याप्रकरणी प्राप्त वैद्यकीय सुचनेवरून पोलीस ठाणे एमआयडीसी येथे पोउपनि. व्यंकटेश नुलगोंडावार यांनी अकस्मात मृत्यूची नोंद केली आहे. पुढील चौकशी सुरू आहे.

**(मिसिंग)**

**पोलीस ठाणे जुनी कामठी :–** राजेश लक्ष्मण मेश्राम, वय ४४ वर्षे, रा. हरदास नगर, कामठी, नागपूर हे दिनांक १७.०८.२०२६ चे ०६.०० वा. चे सुमारास पोलीस ठाणे जुनी कामठी हद्दीतील राहते घरुन कोणाला काहीही न सांगता कुठेतरी निघुन गेले. घरी परत आले नाही. त्यांचा शोध घेतला असता मिळून आले नाही. **वर्णन** रंग–गोरा, चेहरा–लांबट, बांधा–मजबुत, उंची–५ फुट ५ इंच, डोळे–घारे, केस–काळे पांढरे, अंगात–काळा टि–शर्ट व मरुन रंगाचा लोअरपॅन्ट घातलेला आहे. भाषा–मराठी/हिंदी बोलतात. ओळख–दोन्ही हातास खरुज झालेली आहे.



राजेश

**(ईतर)**

**आरोपींनी न्यायालयात हजर होणेबाबत :–**

मा. विद्यमान न्यायाधीश यांनी त्यांचे कोर्टातील केस क्र. व कलम मधील खालील नमुद आरोपी/साक्षीदार हे तारखेवर सतत गैरहजर राहत असल्याने त्यांचेविरुध्द जाहीरनामा प्रसिध्द केला आहे. खालील तक्त्यात नमुद आरोपी/साक्षीदार यांनी नमुद तारखेपर्यंत मा. न्यायालयासमोर हजर व्हावे.

| अ | कोर्टाचे नाव | केस क्र. | कलम | आरोपीचे नाव व पत्ता | पेशी तारीख |
|---|---|---|---|---|---|
| १. | मा. ३ रे सहदिवाणी न्यायाधिश क. स्तर | ३१८२४२/ २०१३ | कलम १३८ एनआय | रुपेश चंदनदास रहाटे, रा. प्लॉट क्र. १३, गंगाबाई घाट रोड, | १६.०९.२०२६ |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | तथा प्रथम श्रेणी न्याय दंडाधिकारी साहेब, नागपुर. | | ॲक्ट | उत्तम टाईल्सचे समोर, जुना बगडगंज, नागपुर. | |
| २. | मा. २रे अति. मुख्य न्याय दंडाधिकारी, नागपुर. | ३२७९५३/ २०१३ | कलम १३८ एनआय ॲक्ट | राजु रामाजी सुर्यवंशी, रा. भस्मे गल्ली नं. ३, राजेंद्र नगर झोपडपट्टी, नंदनवन, नागपुर. | १९.०९.२०२६ |
| ३. | मा. मुख्य न्याय दंडाधिकारी साहेब, नागपुर. | ३०३८९०/ २००९ | कलम ३२४ भा.दं.वि. | बॉबी उत्तमसिंग रावत, रा. दर्शन कॉलनी, ए. के. पांडे यांचे घरी किरायाने, नागपुर. | १६.०९.२०२६ |
| ४. | मा. मुख्य न्याय दंडाधिकारी साहेब, नागपुर. | ३०३५०८/ २०११ | कलम ३२५ भा.दं.वि. | आकाश उर्फ गोलु विनायक बांते, रा. पडोळे नगर झोपडपट्टी, गुणीजन काठोळे चे घराजवळ, नंदनवन नागपुर. | १७.०९.२०२६ |
| ५. | मा. मुख्य न्याय दंडाधिकारी साहेब, नागपुर. | २३०/ २०१६ | कलम ३९२ भा.दं.वि. | मोहम्मद जावेद मोहम्मद समेउद्यीन, रा. हसनबाग, मोठ्या मस्जिद जवळ, कादरीया शाळे जवळ, नागपुर. | १६.०९.२०२६ |
| ६. | मा. मुख्य न्याय दंडाधिकारी साहेब, नागपुर. | ३०३५६९/ २०११ | कलम ४,२५ भा.ह.का. | मनिष ईश्वरदास गौरखेडे, रा. समता नगर, नारी रोड, जरीपटका, नागपुर. | १६.०९.२०२६ |

**स्वा/—**
**( नितीन चुलपार )**
**सहा.पोलीस निरीक्षक,**
**पोलीस जनसंपर्क अधिकारी,**
**नागपुर शहर.**

## वाहतुक शाखेची प्रेसनोट

वाहतूक परिमंडळ कॉटन मार्केट, इंदोरा नागपूर शहर हद्दीत महाराष्ट्र रेल इनफ्रास्ट्रक्चर डेव्हलपमेंट कॉर्पोरेशन लिमिटेड तर्फे ब्रिज ट्रॅक ॲण्ड टॉवर लिमिटेड कडुन पहलवान शाह बाबा दर्गा जवळील मोतीबाग रेल्वे पुलिया येथे रेल्वे ट्रॅकचे वर तसेच, बाजुला ३६, २४ व १८ मिटर स्टीलचे गर्डर टाकण्याचे काम ०७ दिवसात करण्यात येणार आहे. त्याकरीता मोतीबाग रेल्वे पुलीयाचे कामादरम्यान त्या ठिकाणाहून वाहतूक वळविणे आवश्यक आहे. सदरच्या भागात दिवस/रात्र व्यस्त वाहतूक असते. करीता नमुद कामाचे दरम्यान वाहतूकीचे

नियमन व नियंत्रण ठेवणे आवश्यक आहे. रस्त्यावर वाहतूकीची कोंडी निर्माण होवू नये, त्यामुळे वाहतुक वळविण्याबाबत खालील प्रमाणे अधिसुचना निर्गमित करण्यात आली आहे.

- कडबी चौकाकडुन मोतीबाग रेल्वे पुलाखालून पुढे जाणारी संपुर्ण वाहतूक ही कडबी चौकातून गड्डीगोदाम चौक, सदर किंवा इंदोरा चौक मार्गे जातील.
- गार्ड लाईन कडुन मोतीबाग रेल्वे पुलिया खालून मोतीबाग कडे जाणारी संपुर्ण वाहतूक ही सी.ए रोडने मेयो हॉस्पीटल चौक मार्गे जातील.
- मोमिनपुरा चौकाकडुन मोतीबाग रेल्वे पुलाखालुन मोतीबाग, कडबी चौकाकडे जाणारी संपुर्ण वाहतूक ही गार्ड लाईन मार्गे मेयो चौकाकडुन पुढे जातील.

**सदर अधिसुचना दिनांक १५.०९.२०२६ रोजीपासून ते दिनांक १८.०९.२०२६ रोजीपर्यत अंमलात राहील.**

नागपूर शहरातील सर्व वाहन चालकांनी या अधिसुचनेचे पालन करून आपली होणारी गैरसोय टाळावी व पोलीसांना सहकार्य करावे.

**स्वा/—**

**( आदित्य मिरखेलकर, भापोसे )**

पोलीस उप आयुक्त, वाहतूक,

नागपूर शहर.